# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### राज्यात राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान अंतर्गत उच्च शिक्षणाकडे दुर्लक्ष होत असल्याबाबत

**(१) ४४८३९ (१७-०९-२०२२). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या २ टक्के रक्कम ही उच्च शिक्षणावर खर्च केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५ ते २०२१ या कालावधीत प्रत्यक्षात २ टक्के ऐवजी ०.३१ टक्के इतकाच खर्च झाला असल्याचे भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग) यांच्या अहवालातून दिनांक २६ मार्च, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भविष्यात राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानतंर्गत राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या २ टक्के रक्कम उच्च शिक्षणावर खर्च करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१०-०३-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या दि. ३१ मार्च , २०२१ रोजीच्या अनुपालन अहवालातील निरिक्षणांनुसार सन २०१५ ते २०२१ या कालावधीत प्रत्यक्षात २ टक्के ऐवजी ०.३१ टक्के इतका खर्च झाला असल्याचे निदर्शनास आले आहे. वास्तविकत: सदर अहवालात उच्च शिक्षणावर केवळ उच्च शिक्षण उपविभागा अंतर्गत केलेला खर्च नमूद केला असून उच्च शिक्षण विभागाच्या कक्षेत खाजगी स्वरूपाच्या अनेक उच्च शिक्षण संस्था व महाविद्यालयेही येतात त्याव्दारे उच्च शिक्षणावर होणरा खर्च, समाजकल्याण विभाग, आदिवासी विभाग, अल्पसंख्याक विभाग, क्रिडा विभाग यांच्याकडून उच्च शिक्षणासाठी होणारा खर्च याशिवाय कृषी शिक्षण, वैद्यकीय शिक्षण आणि तंत्र शिक्षण हे ही उच्च शिक्षणाशी संबधित असून त्यासाठी होणारा खर्च या खर्चाचा समावेश केलेला नाही. सदर बाब लक्षात घेता राज्याचा उच्च शिक्षणावरील खर्च वाढत्या स्वरूपात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अनुसूचित जातीचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सहकारी तत्वावर राज्यात १७ सूत गिरण्यांना दिलेली परवानगी..

**(२) ५००८१ (१८-०१-२०२३). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जातीमढील नागरीकांचा आर्थिक विकास व्हावा व सहकाराच्या माध्यमातून त्यांनी मुख्य प्रवाहात येवून प्रगती साधावी यासाठी राज्याच्या समाजकल्याण विभागाकडून १७ सूत गिरण्यांना परवानगी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी आतापर्यंत किती सुत गिरण्या बांधून पूर्ण करण्यात आलेल्या आहेत,

(३) असल्यास, त्यापैकी किती सूत गिरण्या सध्या सुरु आहेत, उर्वरित सूत गिरण्या सुरु न होण्याची कारणे काय आहेत व त्या केव्हा सुरु करण्यात येतील ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१४-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे. अनुसूचित जातीमधील सभासदांच्या २१ मागासवर्गीय सहकारी सूतगिरण्यांनी शासनाने निवड केली असून भागभांडवल अदा आहे. त्यापैकी १७ सहकारी सूतगिरण्यांना समाजकल्याण विभागाकडून दीर्घ मुदत कर्ज प्रदान केले आहे.

(२) ८ सहकारी सूतगिरण्यांचे बांधकाम १००% पूर्ण झालेले आहे.

(३) पूर्ण बांधकाम झालेल्या ८ सहकारी सूतगिरण्या सुरु आहेत.

---

## 'चेंबूर-कर्नाटक कॉलेज ऑफ लॉ' या महाविद्यालयाने मराठीमध्ये परीक्षा घेण्यास नकार दिल्याबाबत

**(३) ५०५७९ (१८-०१-२०२३). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत असलेल्या सर्व महाविद्यालयांना परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना इंग्रजीबरोबरच मराठी भाषेचा पर्याय देण्याच्या सूचना देण्यात आलेल्या असतानाही 'चेंबूर-कर्नाटक कॉलेज ऑफ लॉ' या महाविद्यालयाने विधी अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या सत्राची अंतर्गत परीक्षा इंग्रजीतूनच देण्यात यावी असे अनिवार्य केल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महाविद्यालयातील मराठी मातृभाषा असलेल्या विद्यार्थ्यांनी मराठीमध्ये परीक्षा घ्यावी याबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१०-०३-२०२३) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

मुंबई विद्यापीठाकडून प्राप्त माहितीनुसार चेंबूर–कर्नाटक कॉलेज ऑफ लॉ या महाविद्यालयाने सप्टेंबर, २०२२ मध्ये घेतलेल्या विधी अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या सत्राच्या अंतर्गत परीक्षा विद्यार्थ्यांना इंग्रजीतून देणे अनिवार्य केले या भीतीने सात विद्यार्थ्यांनी कॉलेजला निवेदन दिले होते, परंतु, तद्नंतर महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना मराठीत परीक्षा देण्याची परवानगी दिली असून सदर निवेदन विद्यार्थ्यांनी लिखित स्वरूपात मागे घेतले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामपंचायत असलेल्या प्रत्येक गावात किमान ड वर्गाचे ग्रंथालय सुरू करण्याबाबत

**(४) ५१७५५ (१८-०१-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायत असलेल्या प्रत्येक गावात किमान ड वर्गाचे ग्रंथालय सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवण्याच्या सूचना ग्रंथालय संचालनालयाला मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी दिल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आत्तापर्यंत एकुण किती ग्रामपंचायती मध्ये ड वर्गाचे ग्रंथालय सुरू करण्यात आले आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१६-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यात १२१४९ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये असून त्यापैकी १५२ ग्रंथालये ग्रामपंचायतकडून चालविले जातात. सदर १५२ ग्रंथालयांपैकी २४ ग्रंथालये ही “ड” वर्गाची आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठात घेण्यात येणारी सेट परीक्षा बंद करण्याबाबत

**(५) ५१७७२ (१८-०१-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकार व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार राज्यात शंभर टक्के प्राध्यापक भरती करावी तसेच सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठकडून घेण्यात येणारी सेट परीक्षा बंद करण्यात यावी इ.मागणींसाठी काही शैक्षणिक संघटनांनी संचालक, उच्च शिक्षण कार्यालय (सेंट्रल बिल्डींग) ते सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ यादरम्यान संघर्ष यात्रा काढली असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागण्यांसाठी राज्यातील प्राध्यापक कामबंद आंदोलन करणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१०-०३-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.

संचालक, उच्च शिक्षण यांचेकडून प्राप्त माहितीनुसार नेट-सेट पीएच.डी. धारक संघर्ष समिती यांचे पत्र क्र. NSPDSS: ३०९/२०२२-२३, दि. १६.१०.२०२२ अन्वये दि.२७,२८ व २९ ऑक्टोबर २०२२ रोजी संचालक, उच्च शिक्षण संचालनालय कार्यालयासमोर आंदोलन करत असलेबाबत कळविण्यात आले होते. सदर पत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये केंद्र शासन व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार १०० टक्के प्राध्यापक भरती करावी या मागणीचा समावेश आहे. तथापि, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून घेण्यात येणारी सेट परीक्षा बंद करण्यात यावी या मागणीचा समावेश नव्हता. सदर आंदोलनामध्ये दि. २९.१०.२०२२ रोजी उच्च शिक्षण संचालनालय ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे पर्यंत संघर्ष पदयात्रा काढण्यात आली.

(२) हे खरे नाही.

संचालक, उच्च शिक्षण यांचेकडून प्राप्त माहितीनुसार उपरोक्त मागण्यांसाठी कामबंद आंदोलन करण्याबाबत कोणत्याही संघटनेचे पत्र/निवेदन संचालनालयास प्राप्त झालेले नाही.

(३) मुद्या क्र. १ मध्ये नमुद पदभरती संदर्भातील मागणीच्या अनुषंगाने उच्च शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. आढावा १५१३/प्र.क्र. १२५(भाग आठ)/ मशि ५, दि. १२.११.२०२१ अन्वये अनुदानित महाविद्यालयांमधील दि. ०४.०५.२०२० अखेर रिक्त असलेल्या २०८८ पदांच्या भरतीस व सर्व विद्यापीठांमधील ६५९ रिक्त शिक्षकीय पदे भरण्यास मान्यता देण्यात आली असून पद भरतीची प्रक्रिया प्रचलित कार्यपध्दतीने सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध समस्यांबाबत

**(६) ५१८४४ (१८-०१-२०२३). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये अनियमितता दिसून येत असल्याने अनेक विद्यार्थ्यांना नोकरी गमावण्याची वेळ आली असून विद्यापीठाकडून परीक्षा उशिरा सुरु करुन परीक्षांचा निकालही उशिरा घोषित करत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यापीठातील अनेक समस्यांसंदर्भात विद्यापीठ परिसरात विद्यार्थ्यांच्या अनेक संघटनांनी आंदोलन करुन आपल्या मागण्यांचे निवेदन विद्यापीठ प्रशासनाकडे दिले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१६-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने मार्च २०२२ परीक्षांच्या आयोजनाबाबत कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थांच्या शैक्षणिक हितासाठी सहानुभूतीपूर्वक विचार करून विद्यापीठ अधिकार मंडळासमोर दि. ३१ मे, २०२२ रोजी प्रस्ताव सादर केला होता. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार संबंधित अभ्यासक्रमाची सत्रपूर्तता झाल्यानंतर सदर परीक्षा जून २०२२ मध्ये लेखी स्वरुपात आयोजित करण्यात आल्या. तसेच दोन पेपरमध्ये किमान दोन दिवसांचे अंतर ठेवून परीक्षा आयोजित करण्यात आल्यामुळे परीक्षांचा आयोजनाचा कालावधी वाढला. मार्च/ एप्रिल २०२२ मधील सर्व विद्याशाखानिहाय एकूण ६,२६,२७८ विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर करण्यात आले. पारंपरिक अभ्यासक्रमांचे निकाल हे प्रथमच क्रेडिट सिस्टमचा अवलंब करून जाहीर करण्यात आले त्यामुळे काही निकाल जाहीर करण्यास विलंब झाला. विद्यापीठाच्या परीक्षांमुळे कोणत्याही विद्यार्थ्यास नोकरी गमवण्याची वेळ आली असल्याबाबतची कोणतीही पत्रे/निवेदने विद्यापीठास प्राप्त झालेली नाहीत.
(२) व (३) होय, हे खरे आहे.
विद्यार्थी संघटनांनी आंदोलन करून निवेदने सादर केली होती. त्यास अनुसरून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी सहानुभूतीपूर्वक विचार करून विद्यापीठाने विधी अभ्यासक्रमातील तरतुदीनुसार Scaling Down तसेच एकत्रित उत्तीर्णतेचे शीर्षानुसार (Combined Passing) निकालाबाबतचा निर्णय विद्यार्थी संघटनांना कळविण्यात आला.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बल्लारपूर (जि.चंद्रपूर) तालुक्यात स्वस्त धान्याचे नियमित वाटप होत नसल्याबाबत

**(७) ५२१२२ (१८-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बल्लारपूर (जि.चंद्रपूर) तालुक्यात गत दहा महिन्यापासून शिधापत्रिका धारकांना स्वस्त धान्य वेळेवर व नियमित मिळत नसून नवीन शिधापत्रिकाधारकांना मागील दोन वर्षापासून धान्य मंजूर झाले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक संघटनांनी बल्लारपूर तहसीलदारांना माहे ऑगस्ट २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शिधापत्रिका धारकांना वेळेवर व नियमित धान्य पुरवठा करण्याबाबत तसेच दोन वर्षापासून धान्य मंजूर न झालेल्या लाभार्थ्यांना धान्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही. दि. २४ जानेवारी, २०२३ पर्यंत माहे नोव्हेंबर,२०२२ महिन्यापर्यंतचे अन्नसुरक्षा योजना व प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेचे अन्नधान्य सर्व रास्तभाव दुकानात पोहोचले असून त्यांच्यामार्फत पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरित झाले असल्याचे AePDS Report वरून दिसून येते.

दि. १८.०२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये चंद्रपूर जिल्ह्याकरीता ३७८ अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिका व ३०१८ प्राधान्य कुटुंबाचे लाभार्थी एवढा वाढीव इष्टांक देण्यात आला होता. त्यापैकी २४६ अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिका व १८८० प्राधान्य कुटुंबाचे लाभार्थी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत समाविष्ट करण्यात आलेले आहेत व उर्वरित लाभार्थ्यांची देखील निवड करण्यात आली असून त्यांना शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीद्वारे अन्नसुरक्षा योजनेत समाविष्ट करण्याची कार्यवाही चालू आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात लाभार्थ्यांना शिधापत्रिका वाटपास दिरंगाई होत असल्याबाबत**

**(८) ५२१२७ (२६-१२-२०२२). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अंत्योदय (दारिद्रेषेखालील) व अन्नसुरक्षा योजनांतील कार्डधारकांना धान्य मिळत असून शिधापत्रिका मिळणेबाबत तसेच त्यातील दुरुस्तीबाबतचे अनेक अर्ज प्रलंबित अाहेत, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, राज्यात विशेषत: सोलापूर जिल्ह्यात नवीन विभक्त, दुबार रेशन कार्ड नवीन नाव समाविष्ठ करणे, नाव कमी करणे यासाठी अनेक लाभार्थ्यांनी अर्ज केलेले असणे, शासनाच्या वैद्यकीय सवलती व शालेय शिक्षणासाठी उत्पन्नाचा दाखला मिळणेसाठी शिधापत्रिका आवश्यक असताना जिल्ह्यामध्ये कर्मचारी नसल्याचे कारण सांगून ५ ते ६ महिने विलंब होवूनही शिधापत्रिका मिळत नसल्याने नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात सर्व तहसिल कार्यालयांकडे लाभार्थ्यांना नवीन विभक्त, दुबार रेशन कार्डधारक, रेशन कार्ड दुरुस्ती करणे इत्यादी प्रलंबित अर्जांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२१-०२-२०२३) :**(१) नवीन, दुय्यम व विभक्त शिधापत्रिका यासाठी तसेच शिधापत्रिकेमध्ये नाव कमी करणे व नाव वाढविणे यासाठी लाभार्थ्यांकडून अर्ज प्राप्त होणे व प्राप्त अर्जांवर निकषानुसार कार्यवाही करणे ही निरंतर प्रकीया आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

सोलापूर जिल्हयातील ११ तालुक्यामध्ये नवीन, विभक्त, दुबार रेशनकार्ड हे जास्तीत जास्त पंधरा दिवसात दिले जातात, नाव कमी व नाव समाविष्ट करणे किंवा वैद्यकीय सवलतीसाठी दोन दिवसात कार्ड दिले जातात. तसेच शिधापत्रिकेत पुरवठा पत्रिका/ शिधापत्रिका शिधा वस्तुसाठीच दिलेली आहे, अन्य कोणत्याही पुराव्यासाठी नाही असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. शिधापत्रिका मागणीनुसार लाभार्थ्यांना त्वरीत उपलब्ध करुन दिली जात आहे.

सोलापूर शहरामध्ये अन्नधान्य वितरण अधिकारी यांचे अधिनस्त परिमंडळ कार्यालयाकडून नवीन, विभक्त, दुबार रेशन कार्ड, नवीन नाव समाविष्ट करणे, नाव कमी करणे तसेच शासनाच्या वैद्यकीय सवलती व शालेय शिक्षणासाठी उत्पन्नाचा दाखला मिळणेसाठी आवश्यक शिधापत्रिकेसाठी लाभार्थ्यांनी केलेल्या अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही

करणेत येते. तसेच नवीन, दुय्यम व विभक्त शिधापत्रिका यासाठी तसेच शिधापत्रिकेमध्ये नाव कमी करणे व नाव वाढविणे इत्यादी प्रलंबित अर्ज विहित कालमर्यादेमध्ये निकाली काढणेबाबत शासनपत्र दिनांक १६.०२.२०२३ अन्वये क्षेत्रीय कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुंभार समाजाच्या विकासासाठी वर्धा येथे श्री. संत शिरोमणी गोरोबा काका मातीकला बोर्डाची स्थापना करण्याबाबत

**(९) ५२३४० (१८-०१-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुंभार समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक विकास, सामाजिक उन्नतीसाठी व प्रगतीसाठी वर्धा येथे श्री. संत शिरोमणी गोरोबा काका मातीकला बोर्डाची स्थापना करण्यास शासनाने दि ८ मार्च, २०१९ रोजी मान्यता देवूनही काम करण्यास अद्याप सुरुवात झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बोर्ड कार्यरत करण्यासाठी शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदर बोर्ड कार्यरत करण्यासाठी आवश्यक त्या प्रशासकीय व वित्तीय कार्यवाही शासनस्तरावर सुरू होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०२-०३-२०२३) :** (१) व (२) राज्यातील कुंभार समाजाच्या उन्नतीसाठी व प्रगतीसाठी वर्धा येथे श्री. संत शिरोमणी गोरोबा काका मातीकला बोर्डाची स्थापना दिनांक ८ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आलेली आहे. सदर बोर्ड कार्यरत करण्यासाठी अशासकीय सदस्य नियुक्त करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) श्री. संत शिरोमणी गोरोबाकाका मातीकला मंडळाचा प्रशासकीय व इतर अनुषंगिक खर्च भागविण्यासाठी सन २०१९-२० या वित्तीय वर्षापासून मागणी क्र.के-७, २८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग या मुख्य लेखाशिर्षाखाली नवीन उपलेखाशिर्ष उघडण्यास दिनांक २२.०१.२०२० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## लातूर-बार्शि मार्गे टेंभुर्णी येथे सोलापूर-पूणे राष्ट्रीय महामार्गाला जोडणा-या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामांबाबत

**(१०) ५२३९८ (१८-०१-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर-बार्शि मार्गे टेंभुर्णी येथे सोलापूर-पूणे राष्ट्रीय महामार्गाला जोडणा-या रस्त्याचे चौपदरीकरणाचे विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सल्लागाराची नेमणूक केली आहे काय तसेच सल्लागार कंपनीने अहवाल शासनास सादर करुन त्यात कोणत्या शिफारशी केल्या आहेत व त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२०-०२-२०२३) :**(१) होय.
(२) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मार्फत टेंभुर्णी कुर्डुवाडी बार्शी येडशी लातूर राज्य महामार्ग क्र.७७ दुपदरीकरणाचे विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम मे.टी.पी.एफ.इंजिनिअरींग प्रा.लि. मुंबई यांना

दि.०१.०६.२०१६ रोजी दिले होते. तथापि सदर राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचे मागणीनुसार भुपृष्ठ परिवहन मंत्रालय मार्फत सदर महामार्गाचे चौपदरीकरणाचे विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्याविषयी बैठकीत सुचित केले. त्या अनुषंगाने मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग (सा.बां), कोकण भवन,नवी मुंबई यांनी पुर्वीच्याच मे.टी.पी.एफ.इंजिनिअरींग प्रा.लि. मुंबई मार्फत चौपदरीकरणाचे विस्तृत प्रकल्प अहवाल लवकर तयार होण्याच्या दृष्टीने सुधारीत मंजूरीसाठीचा प्रस्ताव मुख्य अभियंता तथा प्रादेशिक अधिकारी,भुपृष्ठ परिवहन मंत्रालय,कोकण भवन,नवी मुंबई यांना दि.१२.१०.२०२२ रोजी सादर केला आहे. सदर प्रस्तावास मंजूरी प्राप्त होताच काम लवकरच होती घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती येथील उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयासमोर प्राध्यापकांनी आंदोलन केल्याबाबत

**(११) ५२४२० (१८-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने दिनांक १८ जुलै, २०१८ चे युजीसी रेग्युलेशन जसेच्या तसे लागू करणे बंधकनकारक असतानाही त्यामध्ये फेरबदल केले आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी प्राध्यापकांनी अमरावती येथील उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयासमोर आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत युजीसी रेग्युलेशन बाबतीतल्या प्राध्यापकांच्या मागण्यांसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२२-०२-२०२३) :** (१) (२) व (३) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.१८.०७.२०१८ च्या नियमावलीमधील तरतुदी लागू करण्यात याव्यात यासंदर्भात नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटनेने सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग यांना निवेदन देऊन आंदोलन केले होते हे खरे आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने दि.१८.०७.२०१९ च्या नियमावलीन्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षक समकक्ष पदांच्या शैक्षणिक अर्हता, पात्रता, अनुभव व इतर सेवाशर्ती विहित केलेल्या आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सदर नियमावलीतील शैक्षणिक अर्हता, पात्रता, अनुभव इत्यादी अर्हता जशाच्या तशा, तसेच इतर सेवाशर्ती आवश्यक त्या बदलासह शासन निर्णय दि.०८.०३.२०१९ व दि.१०.०५.२०१९ अन्वये राज्यात लागू करण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जालना जिल्हयातील जाफ्राबाद तालुक्यातील ऊसतोड मजुरांच्या मुलांच्या प्रवेशाबाबत

**(१२) ५२५२२ (१८-०१-२०२३). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जाफ्राबाद (जि.जालना) तालुक्यातील ऊसतोड मजुरांसमवेत स्थलांतर झालेले आणि तालुक्यात विविध ठिकाणाहून आलेल्या ऊसतोड मजुरांच्या मुलांना शाळेत शिक्षणाच्या प्रवेशासाठी शिक्षण हमी कार्ड दिले जाणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकुण किती विद्यार्थ्यांना शिक्षण हमी कार्ड देण्यात आले आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०२-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जालना जिल्ह्यातील जाफ्राबाद तालुक्यात एकूण १८ विद्यार्थ्यांना शिक्षण हमी कार्ड देण्यात आले आहे.
(३) स्थलांतरित विद्यार्थ्यांना स्थलांतरित झालेल्या ठिकाणी शाळेत दाखल करणेबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठी मध्ये अथवा स्थानिक भाषांमध्ये उच्च तंत्र शिक्षण देणे बाबत**

**(१३) ५२५५६ (१८-०१-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आयआयटी सारख्या तंत्रशिक्षण देणाऱ्या प्रतिष्ठित संस्थासह अन्य स्थानिक भाषेत तसेच सर्व राज्यांमध्ये इंग्रजी ऐवजी स्थानिक भाषेत उच्च तंत्र शिक्षण देण्याची शिफारस संसदिय समितीने केली असल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उच्च तंत्र शिक्षण राज्यात हिंदी अथवा मराठी भाषेत देणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०८-०३-२०२३) :** (१)अंशत: खरे आहे,

देशातील सर्व तंत्रशिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये हिंदी किंवा स्थानिक भाषेत उच्च शिक्षण देण्यात यावे आणि इंग्रजीचा वापर ऐच्छिक करावा अशी शिफारस संसदिय समितीने केली असल्याबाबतचे वृत्त दि.९/१०/२०२२ रोजीच्या "दि.टाईम्स ऑफ इंडिया" या इंग्रजी वृत्तपत्रात .प्रसिध्द झाले होते.
(२) आखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून प्रादेशिक भाषेमध्ये अभ्यासक्रम राबविण्यास इच्छुक संस्थांना मान्यता देण्याची तरतूद करण्यात आली आहे. यानुसार राज्यातील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून संगणक शाखेतील पदवी अभ्यासक्रम मराठी भाषेतून राबविण्यात येत आहे.

तसेच पदविका अभ्यासक्रमांच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या नियामक परिषदेने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता अध्यापनाच्या प्रक्रियेची अंमलबजावणी ऐच्छिक स्वरूपात मराठी- इंग्रजी व्दिभाषिक माध्यमातून राबविण्यास मान्यता दिली आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये ३६५ पैकी १६३ पदविका संस्थांनी ( अंदाजे ४५ %) व्दिभाषिक पध्दतीने अभ्यासक्रम शिकविण्याचा पर्याय विद्यार्थ्यांस उपलब्ध करून दिला असून, याकरीता मंडळामार्फत त्यांच्या संकेतस्थळावर मराठी-इंग्रजी व्दिभाषिक भाषेमध्ये शैक्षणिक साधन सामग्री ( Learning Material ) निशुल्क उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**कळवण व सुरगाणा (जि.नाशिक) तालुक्यातील रस्ते व पुलांची दुरुस्ती करणेबाबत**

**(१४) ५२५६६ (१८-०१-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळवण व सुरगाणा (जि.नाशिक) तालुक्यातील दिनांक १ ते १० जुलै, २०२२ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील रस्ते व पूल वाहून गेल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कळवण व सुरगाणा तालुके डोंगर उतारावरील १०० टक्के आदिवासी बहुल तालुके असून या ठिकाणी पर्जन्यवृष्टीचे प्रमाण जास्त असल्यामुळे पुल व रस्ते वाहून गेल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम, नाशिक यांना सदर पूल व रस्ते दुरुस्ती करण्याबाबत लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१३-०२-२०२३) :**(१) अतिवृष्टीमुळे रस्ते व पुल क्षतिग्रस्त झाले, हे खरे आहे.
(२) क्षतिग्रस्त झालेले रस्ते व पूलांची तात्पुरत्या स्वरुपात दुरुस्ती करण्यात आलेली असून रस्ते वाहतूकीसाठी सुरळीत करण्यात आले आहेत.
(३) हे खरे आहे.
(४) कायमस्वरुपी दुरुस्तीची कामे निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आमदार निवास नागपूर येथे कामानिमित्त जाणाऱ्या अभ्यागतांकडून मेंटनसच्या नावे ज्यादा रक्कम घेण्यात येत असल्याबाबत**

**(१५) ५२६१७ (१८-०१-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विधीमंडळ सदस्यांसाठी मुंबई आणि नागपूर येथे स्वतंत्र आमदार निवासाची व्यवस्था असून प्रत्येक विधीमंडळ सदस्यांच्या मतदारसंघातील नागरीक कामानिमित्त नागपूर आणि मुंबई येथे जात असून मुंबई येथील आमदार निवास येथे प्रवेश निशुल्क असतांना नागपूर येथील आमदार निवासामध्ये विधिमंडळ सदस्यांच्या पत्रांन्वये जाणाऱ्या अभ्यागतांकडून रुपये १०००/- भाडे आकारले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आकारण्यात आलेले भाडे शासन आदेशानुसार आकारण्यात आले असल्याचे आमदार निवास नागपूर येथील कार्यरत कर्मचाऱ्यांमार्फत सांगण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आकारण्यात आलेले भाडे अधिक असल्याने ते कमी करुन रुपये २०० करण्याबाबत अभ्यागतांकडून मागणी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आमदार निवास नागपूर येथील भाडे कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१७-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
दि.१८ जानेवारी, २०१० च्या शासन निर्णयानुसार विधीमंडळ सदस्यांच्या व्यतिरिक्त त्यांचे शिफारशीनुसार येणाऱ्या खाजगी व्यक्ती यांचेकडून रू.१०००/- भाडे आकारण्यात येत आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) होय. हे खरे आहे.
(४) आमदार निवास, नागपूर येथील भाडे कमी करण्याबाबत कोणतीही कार्यवाही विचाराधीन नाही.
(५) प्रश्न उभ्दवत नाही.

---

**वाघोली ते शिक्रापुर (जि.पुणे) राष्ट्रीय महामार्गावर दोन मजली उड्डाणपूलाच्या प्रस्तावित कामाबाबत**

**(१६) ५२७११ (१८-०१-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाघोली ते शिक्रापुर (जि.पुणे) या राष्ट्रीय महामार्गावर वाहतुकीच्या प्रमाणात असल्याने विदर्भ मराठवाडा तसेच पुण्याकडे जाणाऱ्या प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या राष्ट्रीय महामार्गावर सुमारे ७२०० कोटी रुपये सहा-सहा लेनचे दोन मजली कॉरिडॉर उभारणे व यावर हायपर लूपचा प्रयोग करण्याबाबतचे काम प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कामाला मंजूरी मिळून काम सुरु होणेबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२०-०२-२०२३) :**(१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) तळेगाव-चाकण-शिक्रापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८ डी या महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारित आहे.
भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने (NHAI) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची (Project Management Consultant) नेमणूक केली असून DPR कन्सल्टंट कडून सद्यस्थितीतील वाहतूक वर्दळ,नियोजित पुणे रिंगरोड तसेच भविष्यात होणारी वाहतूकीतील वाढ,एमआयडीसी परीसरातील वाढते उदयोग तसेच पीएमआरडीए कडून नियोजित असलेले हायवे प्रकल्प या सर्वाचा विचार करुन आवश्यकतेनुसार सहा-सहा लेनचे दोन मजली कॉरिडॉर किंवा इतर पर्यायांचा विचार करुन प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यात येत आहे. प्रकल्प अहवाल पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाची अंतिम अंदाजित किंमत निश्चित होईल. तसेच प्रकल्प अहवालास सक्षम प्राधिकरणाकडून मंजूरी घेण्यात आल्यानंतर भूसंपादन व इतर कामे सुरु करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावनेर व कळमेश्वर (जि.नागपूर) तालुक्यातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१७) ५२७६५ (१८-०१-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावनेर व कळमेश्वर (जि.नागपूर) तालुक्यातील अनेक रस्ते अतिवृष्टी आणि महापुरामुळे खराब झाल्याने रहदारीस अयोग्य झाले असून या रस्त्यांची दुरूस्ती व इतर बांधकामे करण्यासाठी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांनी रस्ते व पुल दुरूस्ती (SR Program) या योजनेअंतर्गत निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी रितसर प्रस्ताव तयार करुन मुख्य अभिंयता सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांच्यामार्फत माहे सप्टेबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडे अंतिम मंजूरीसाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून या कामांना मंजूरी देण्यात आलेली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२२-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) प्रस्तावित केलेली कामे निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील गुंतवणुकीबाबत श्वेत पत्रिका काढण्याची केलेली घोषणा

**(१८) ५२८२१ (१८-०१-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात एकुण २ लाख १५ हजार कोटी रुपयांची उद्योगांनी गुंतवणूक केली असल्याचे माजी उद्योग मंत्री यांनी दिनांक १ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे,
(२) असल्यास, याबाबत आतापर्यंत झालेल्या गुंतवणुकीची श्वेत पत्रिका काढण्याची घोषणा माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान मा.उद्योग मंत्री यांनी केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०३-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मा. मंत्री (उद्योग) यांनी वेदांता, टाटा एअरबस सी २९५, सॅफ्रन व इतर मोठया प्रकल्पांबाबतचा वस्तुस्थिती अहवाल येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सादर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.
(३) वेदांता उद्योग समुहास दि.१४ व १५ जुलै, २०२२ रोजी मा. मुख्यमंत्री तसेच मा. उप मुख्यमंत्री महोदयांच्या पत्राव्दारे राज्य शासनासोबत सामंजस्य करार करण्याबाबत कळविण्यात आले.दि.१५ जुलै,२०२२ रोजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय समितीची (High Powered Committee) बैठक घेण्यात येऊन, सदर बैठकीत सुमारे ३८,०००/- कोटी इतक्या मूल्याची भांडवली प्रोत्साहने, जमीन,वीज, पाणी इ. सवलती व इतर प्रोत्साहने वेदांताच्या नियोजित प्रकल्पास देवू करण्यात आली.तथापि, या घटकाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अथवा राज्य शासनाशी कोणताही सामंजस्य करार केला नाही.

एअरबस-टाटा या बहुराष्ट्रीय कंपनीने त्यांच्या नियोजित प्रकल्पाबाबत गुंतवणूकीकरीता राज्य शासन अथवा एमआयडीसीसोबत सामंजस्य करार (MOU) केलेला नव्हता, अथवा जागेची मागणी करणारा कोणताही अर्ज महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे दाखल केला नाही. तसेच भारतीय हवाई दलासाठी सी - २९५ जातीची मालवाहू विमाने उत्पादित करणारा २२ हजार कोटींचा एअरबस - टाटा प्रकल्प गुजरात मधील बडोदा येथे उभारण्यात येईल अशी घोषणा केंद्रीय संरक्षण सचिव श्री अजय कुमार
यांनी दि. २७ ऑक्टोबर २०२२ रोजी दिल्ली येथे केली.सदर त्यामुळे हा प्रकल्प महाराष्ट्रातून इतर ठिकाणी गेला असे म्हणणे संयुक्तिक नाही.

सॅफ्रन या फ्रेंच बहुराष्ट्रीय कंपनीने त्याच्या नियोजित प्रकल्पाबाबत गुतंवणुकीसाठी अथवा जागेची मागणी करणारा कोणताही अर्ज महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे दाखल केलेला नाही, तसेच सदर कंपनीने सॅफ्रान प्रकल्पाबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाशी कोणतेही चर्चा अथवा पत्रव्यवहार केलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्हयातील मुले शिक्षणापासून वंचित असल्याबाबत

**(१९) ५२९१५ (१८-०१-२०२३). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात शिक्षण विभागाने केलेल्या शोध मोहिमेंतर्गत सहा ते चौदा वयोगटातील एक हजारहून अधिक मुले शिक्षणापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सदर जिल्हयातील आठवी इयत्तेमधून नववी इयत्तेत गेलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश न मिळाल्याने काही मुले शिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे बाल मजुरांचे प्रमाणही वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जिल्ह्यातील आदिवासी व ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०२-०३-२०२३) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२२/ प्र.क्र.१२०/ एसडी-४, दिनांक २३.०६.२०२२ अन्वये पालघर जिल्ह्यामध्ये शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरीत मुलांना शाळेच्या प्रवाहात दाखल करणेसाठी मिशन झिरो ड्रॉपआऊट ही मोहिम दि. ०५ ते २० जुलै,२०२२ या कालावधीत राबविण्यात आलेली आहे. शाळाबाह्य आढळून आलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात शाळेत दाखल करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हा परिषदेच्या २३ शाळा केवळ कागदावरच आदर्श असल्याबाबत**

**(२०) ५२९६१ (१८-०१-२०२३). अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या मराठी व उर्दू माध्यमाच्या २३ शाळा आदर्श शाळा म्हणून विकसीत करण्यासाठी शासन निर्णय जारी करण्यात आला असून किरकोळ बांधकाम करण्यासाठी शासनाकडून दिनांक ४ फेब्रुवारी, २०२२ रोजी निधी देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शासन निर्णयानंतर जिल्हयातील २३ शाळा कागदावरच आदर्श राहिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, तद्अनुषंगाने उक्त शाळा आदर्श करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०३-०३-२०२३) :** (१) अमरावती जिल्ह्यामध्ये जिल्हापरिषदेच्या-२५, महानगरपालिकेची-१, विद्यानिकेतन-१ अशा एकूण-२७ आदर्श शाळा विकसीत करण्यास मान्यता मिळाली असून सदर शाळांना शासन स्तरावरून निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सालेकसा-आमगाव (जि.गोंदिया) येथील वाघ नदीवरील पुलाच्या दुरुस्तीबाबत**

**(२१) ५३०३९ (१८-०१-२०२३). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील सालेकसा-आमगाव या तालुक्यांना जोडणा-या वाघ नदीवरील सन १९७६ मध्ये बांधण्यात आलेला पुल क्षतीग्रस्त झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाची दुरूस्ती करण्यात आली आहे काय तसेच दुरूस्ती वा नविन पुलाच्या बांधकामाबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०६-०३-२०२३) :** (१) होय, क्षतीग्रस्त झाला हे खरे आहे.

(२) सदर पूलाची आवश्यक तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली आहे. नवीन पूलाचे काम निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जत (जि.सांगली) तालुक्यात शाळाबाहय विद्यार्थ्यांचा चुकीचा सर्व्हे झाल्याबाबत

**(२२) ५३१३२ (१८-०१-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यातील ऊस तोडणी मजूर संख्या मोठया प्रमाणात असून याबाबत नुकत्याच शाळाबाह्य विद्यार्थी सर्व्हेक्षण चुकीचे झाले असल्याने नाममात्र विद्यार्थी शाळाबाह्य दाखवण्यात आले असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऊस तोडणी मजुरांच्या मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०२-०३-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) सन २०२२-२३ मध्ये सर्व्हेक्षणानुसार जत तालुक्यात ५९४ विद्यार्थी स्थलांतरित होत असल्याचे आढळून आले होते. त्यापैकी ५७२ विद्यार्थ्यांचे स्थलांतरण वसतीगृहाविना रोखणेत यश आले आहे. उर्वरित स्थलांतरित झालेल्या २२ विद्यार्थ्यांना मूळ शाळेत परत दाखल करुन शिक्षणाच्या प्रवाहात दाखल करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बीड येथील कामांची मुख्य अभियंता (सार्व. बांध) यांच्याकडून चौकशी होऊन कारवाई होणेबाबत

**(२३) ५३१४७ (१८-०१-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड विधानसभा मतदारसंघातील शासकीय इमारती, निवासस्थाने दुरुस्ती FDR व AMC ची कामे नवीन रस्ता, पुलाची कामे, सन २०१९ पुर्वीच्या प्रलंबित कामांचा पाठपुरावा तसेच चौसाळा-नांदुर रस्त्यावरील वाहून गेलेल्या पुलाची पाहणी करुन काम सुरु करणेबाबत संबंधित मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांनी कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे दि. २ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुख्य अभियंता (श्री. उकिर्डे) हे संबंधित कंत्राटदार वा शासकीय अधिकारी यांचेकडून आर्थिक देवाणघेवाण झाल्याशिवाय कोणताही निर्णय घेत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी याप्रकरणी दिनांक ३ ऑगस्ट, २०२२ रोजीपासून वांरवार विनंती व पत्रव्यवहार करुनही याबाबत कारवाई न करता अनियमितता व आर्थिक देवाण-घेवाण करत असल्यामुळे मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम यांची एकूण मत्ता दायित्व याबाबत स्तरनिहाय, लेखाशीर्षनिहाय व खातेनिहाय चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०८-०३-२०२३) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) स्थानिक लोकप्रतिनिधींकडून याबाबत निवेदन प्राप्त झाले आहे. त्यानुषंगाने माहिती घेतली असता, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांचेकडून कामात अनियमितता झालेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गुंज ते महागांव (जि.यवतमाळ) रस्त्याची झालेली दुरवस्था

**(२४) ५३२१८ (१८-०१-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुंज ते महागांव (जि.यवतमाळ) रस्त्याची मोठया प्रमाणात दुरवस्था झाली असून शाळकरी व वृध्दांची गैरसोय होत असून अपघाताची शक्यता निर्माण झाली असल्याने सदरील रस्ता तातडीने दुरुस्त करण्याची मागणी तेथील नागरिकांनी केली असून यासाठी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रस्ता तातडीने दुरुस्त करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२०-०२-२०२३) :** (१) होय , हे खरे आहे.

(२) व (३) सदर रस्ता हा रा.मा.५१ दर्जाचा असून गुंज ते महागांव रस्त्याची एकूण लांबी १०.०० किमी आहे. सदर रस्त्यावर खड्डे भरण्याचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

प्रश्नाधीन रस्त्यांच्या मजबूतीकरणाच्या कामाबाबत निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

### नवीन ग्रंथालयांना मान्यता देणे बाबत

**(२५) ५३२७५ (१८-०१-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थीना वैचारिक आणि बौध्दीक खाद्य देणारे तसेच इतर सर्वांच्या वाचन संस्कृतीला चालना देणाऱ्या ग्रंथालयांना राज्य शासनाकडून मान्यता देणे बंद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नविन ग्रंथालयांना मान्यता देण्यात यावी अशी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रंथालय भारती नागपूर, यांनी लेखी निवेदनाव्दारे मा. उपमुख्यमंत्री आणि मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना माहे जुलै, २०२२ वा त्या दरम्यान केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नविन ग्रंथालयांना मान्यता मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१६-०२-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या मागण्यांबाबत श्रीमती श्वेता महाले, मा. विधानसभा सदस्य (चिखली) आणि ग्रंथालय भारती, नागपूर यांची दि.२२.०८.२०२२ रोजीची निवेदने प्राप्त झाली आहेत.

(३) मा. मंत्रीमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि.०७.०६.२०१४ निर्गमित करण्यात आला आहे. यानुसार "यापुढे नवीन ग्रंथालयांना मान्यता देण्यात येवू नये" असा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मावळ (जि.पुणे) तालुक्यातील वाहतूक कोंडी व अतिवृष्टीमुळे झालेल्या रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत

**(२६) ५३४३२ (१८-०१-२०२३). श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंदर मावळ (ता.मावळ, जि.पुणे) येथील ग्रामीण भागात असणारे अरुंद रस्ते तसेच अतिवृष्टीमध्ये रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे स्थानिक नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भागांमधील सुमारे ४० ते ४२ गावचे नागरिक टाकवे बुद्रुक औद्योगिक वसाहतीमध्ये कामानिमित्त ये जा करत असून शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारे साहित्य तसेच गावातील रुग्णांना शहरी भागातील रुग्णालयात न्यावे लागत असून वाहतूक कोडींमुळे त्यांना अनेक अडचणींना सामा◌ेर जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाहतुकीची कोंडी कमी करण्यासाठी टाकवे बुद्रुक फळणे फाटा ते वडेश्वर पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण करण्याबाबत नागरीकांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार टाकवे बुद्रुक फळणे फाटा ते वडेश्वर पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-०२-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे
(४) सदर रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग दर्जाचा असून साखळी क्र.कि.मी.०/६०० येथे लेव्हल क्रॉसिंग क्र.४५ वर रेल्वे उड्डाण पूलाचे बांधकाम व साखळी क्र. कि.मी. ३/४०० मध्ये पुलाची पूर्नबांधणी करणे ही कामे सद्यस्थितीत प्रगतीत आहेत. रस्त्याचे रुंदीकरणाचे काम निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तळेगाव चाकण शिक्रापूर (जि.पुणे) महामार्गाच्या कामास होत असलेला विलंब

**(२७) ५३४३३ (१८-०१-२०२३). श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळेगाव-चाकण-शिक्रापूर (जि.पुणे) हा महामार्ग आठ पदरी होणार असून चार पदरी रस्ता खालून व चार पदरी रस्ता पहिल्या मजऱ्यावरून असा ५४ किमीच्या दुमजली रस्त्याच्या प्रस्तावाला मा.केंद्रीय वाहतूक मंत्री यांनी मान्यता दिली असून या कामाचे नवीन डीपीआर बनवण्याकरिता संबंधित अधिकाऱ्यांना सुचना देऊन यासाठी १०७८ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत, हे खरे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामासाठी निधी मंजूर असतानांही या रस्त्याचे काम प्रलंबित असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून नागरीकांनी यासाठी आंदोलने व निदर्शने करूनही शासन दुर्लक्ष करत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२०-०२-२०२३) :**(१) तळेगाव-चाकण-शिक्रापूर रा.म.क्र.५४८ डी केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे.

तळेगाव-चाकण-शिक्रापूर हा राष्ट्रीय महामार्ग आठ पदरी करणेच्या अनुषंगाने Project Management Consultancy नियुक्त करणेबाबतच्या सुचना मा.केंद्रिय वाहतूक मंत्री यांनी दिल्या आहेत. त्यानुसार सदर प्रकल्पासाठी लागणा-या Project Management Consultancy ची नियुक्ती करणेत आली आहे व DPR बनविणेच्या कामास सुरुवात झाली असून या प्रकल्पासाठी लागणारे मुल्य हे DPR तयार झाले नंतरच निश्चित होईल.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रांजणगांव (जि.पुणे) येथे इलेकट्रॉनिक वस्तू उत्पादनांचे समुह औद्योगिक केंद्र विकसित करणेबाबत**

**(२८) ५३५९४ (१८-०१-२०२३). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रांजणगांव (जि.पुणे) येथे सुमारे ३०० एकरवर सुमारे ५ हजार कोटीची गुंतवणूक व किमान ६ हजार रोजगार निर्माण होणारा इलेक्ट्रॉनिक वस्तू उत्पादनांचे समूह औद्योगिक केंद्र विकसित केले जाणार आहे हे, खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पामध्ये केंद्र शासन तसेच राज्य शासन एकूण किती रक्कमेची गुंतवणूक करणार आहे,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाचे किती कालावधीत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२७-०२-२०२३) :** (१) सदर प्रकल्पामध्ये रुपये ४९२.८५ कोटी इतक्या रकमेची गुंतवणूक होणार असून सुमारे १२०० रोजगार निर्माण होणार आहे. इलेक्ट्रॉनिक वस्तु उत्पादनांचे समूह औद्योगिक केंद्र पूर्णत: विकसित झाल्यानंतर याठिकाणी मोठ्या प्रमाणात इतर लहान मोठ्या कंपन्यांकडून गुंतवणूक अपेक्षित आहे. त्यामुळे सुमारे १५ ते २० हजार लोकांना भविष्यात रोजगार उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

(२) सदर प्रकल्पामध्ये केंद्र शासनाची गुंतवणूक रुपये २०७.९८ कोटी व राज्य शासनाची (MIDC) गुंतवणूक रुपये २८४.८७ कोटी इतकी आहे.

(३) सदर प्रकल्प ३२ महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) वरीलप्रमाणे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तीर्थक्षेत्र आळंदी देवाची ते अहमदनगर महामार्गावरील छत्रपती संभाजीराजे पुलाची झालेली दुरवस्था**

**(२९) ५३६८१ (१८-०१-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तीर्थक्षेत्र आळंदी देवाची ते अहमदनगर महामार्गावरील हवेली व खेड तालुक्याला जोडणाऱ्या तुळापुर-मरकळ येथील इंद्रायणी नदीवरील छत्रपती संभाजीराजे पुलाची दुरवस्था झाली असल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुलाची दुरुस्ती करून वाहतुकीसाठी सुरु करण्याच्या संदर्भात काही योजना आखण्यात आली आहे काय, असल्यास,यासाठी एकूण किती खर्च अपेक्षित आहे तसेच सदर दुरुस्तीचे काम पूर्ण होण्यासाठी साधारणपणे किती कालावधी लागणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर पुल कमकुवत असल्याने पुलावरुन अवजड वाहतूक बंद करण्यात आली आहे. पुलाची तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली आहे.सदर पुलाच्या कामास मार्च २०२२ मध्ये मंजूरी मिळाली असून नवीन पुलाचे कार्यारंभ आदेश दि.०४/०१/२०२३ रोजी देण्यात आले असून सद्यस्थितीत काम प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खेड (जि.पुणे) तालुक्यातील कोहिंडे बुद्रुक ते औदर रस्त्याची तातडीने दुरस्ती करण्याबाबत

**(३०) ५३६९५ (१८-०१-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील कोहिंडे बुद्रुक ते औदर आणि आळंदी ते लोणीकंद फाटा या मार्गावर अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडणे, धोकादायक वळणावर कठडे किंवा भराव नसणे इ. कारणामुळे या रस्त्यांची दुरवस्था झाल्याने नागरिकांना रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोईचे होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने या दोन्ही रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, असल्यास, प्रस्तावित उपाययोजनांचे स्वरूप आणि त्यासाठी येणारा खर्च यांचा तपशील काय तसेच सदर काम पूर्ण होण्यास किती कालावधी लागेल,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२२-०२-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील कोहिंडे बुद्रंक ते औदर ही प्रश्नांकित लांबी साधारणत: एकूण १०.८५ कि.मी. इतकी असून त्यापैकी वाशेरे ते औदार ५.८५ कि.मी. लांबी ही प्रजिमा १०१ या रस्त्याचा भाग असून या लांबीतील पावसाळ्यानंतर खड्डे डांबराने भरुन रस्ता वाहतुकीस पूर्ववत करणेत आलेला आहे. तसेच सदर रस्त्यावरील २.८५ कि.मी. लांबीत रस्ता रुंदीकरण व सुधारणा करणेचे काम रु.३०४.०० लक्ष रक्कमेस मंजूर असून निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम कार्यान्वीत करणेचे नियोजन आहे.

आळंदी तं लोणीकंद फाटा हा रस्ता राज्य मार्ग ११६ चा भाग आहे. सदर रस्त्यावर १७.४० कि.मी. लांबीत रस्ता डांबरीकरणासह सुधारणा करणे व साखळी क्रमांक २५/५०० मध्ये पूलाची पुर्नबांधणी करणे असे रु.२२ कोटी किंमतीची कामे प्रगतीत असून मे २०२३ अखेर पूर्ण करणेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील चाकण (जि.पुणे) परिसरात होणारे अपघात रोखण्याबाबत

**(३१) ५३७०५ (१८-०१-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील चाकण (जि.पुणे) येथील रस्त्यांची दुरवस्था झाल्याने अपघात होऊन मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्त हानी होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ जानेवारी, २०२२ ते दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत परिसरात झालेले अपघात आणि त्यामधील जीवित/वित्त हानीचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, या महामार्गावरील वाढत्या अपघातांना आळा घालण्यासाठी कोणत्या स्वरुपाची उपापयोजना करण्यात आली आहे, या उपाययोजनांचे स्वरूप आणि त्यासाठी येणारा खर्च यांचा तपशील काय आहे तसेच सदर कामास पूर्ण होण्यास अंदाजे किती कालावधी लागणार आहे?

**श्री. रविंद्र चव्हाण (२०-०२-२०२३) :** (१) होय.

(२) पोलीस स्टेशन चाकण यांच्याकडील प्राप्त अहवालानुसार सन २०२२ मध्ये प्राणांकित अपघात २६,गंभीर अपघात २७ व किरकोळ अपघात ६ झालेले आहेत.

(३) सद्यस्थितीतील पुणे नाशिक महामार्ग खड्डे मुक्त करण्यात आलेला आहे.तसेच विविध सुरक्षा उपाय योजना करण्यात आलेल्या आहेत.

सदरील भागातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी अत्यंत चांगला पर्याय म्हणून नाशिक फाटा ते राजगुरुनगर एलेव्हेटेड कॉरिडॉर प्रकल्पास मार्च २०२२ मध्ये वा त्या सुमारास मान्यता मिळाली आहे.

प्रकल्प लवकरात लवकर करणेकरीता सप्टेंबर २०२२ मध्ये (Project Management Consultancy) नियुक्त करणेत आलेली आहे व प्रकल्प अहवाल बनविणेचे काम प्रगतीपथावर आहे.

---

### एम. एस. सी. फार्मासिटिकल केमिस्ट्री हा पदव्युत्तर अभ्यासक्रम शिष्यवृत्ती पोर्टल मध्ये समाविष्ट करण्याबाबत

**(३२) ५४०२३ (१८-०१-२०२३). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एम. एस. सी. फार्मासिटिकल केमिस्ट्री हा पदव्युत्तर अभ्यासक्रम शासन मान्यतेनुसार सन २०१८-२०१९ पासून सुरू असून शिष्यवृत्ती पोर्टलवर दाखविला जात नसल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्तीचा अर्ज करता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभ्यासक्रमाला मान्यता असूनही या अभ्यासक्रमासाठी फी मंजुर करणे तसेच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा ऑनलाईन अर्ज करता येत नसल्याने विद्यार्थ्यांना संपूर्ण फी भरून प्रवेश घ्यावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अभ्यासक्रमाला शिष्यवृत्ती पोर्टल मध्ये समाविष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०२-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) एम.एस.सी.फार्मास्युटीकल केमिस्ट्री या अभ्यासक्रमाचा महाडीबीटी पोर्टलवर समावेश करण्यात आला असून सदर बाब संबधित महाविद्यालय / संस्था यांना कळविण्याबाबत विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण सोलापूर विभाग, सोलापूर यांना संचालक, उच्च शिक्षण पुणे यांचे स्तरावरुन त्यांचे पत्र दि. २२.२.२०२३ अन्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूर येथील उच्चभ्रू नागरीक अन्नसुरक्षा योजनेचा लाभ घेत असल्याबाबत

**(३३) ५४१५६ (१८-०१-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरगरिबांना अल्पदरात धान्य मिळावे यासाठी अन्नसुरक्षा योजनेतून दर महिना शिधापत्रिकाधारकांना ५ किलो धान्य मिळते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर भागातील उच्चभ्रू भागातील धनिक याचा लाभ घेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नागरिक या धान्याचा लाभ घेत असल्याने गरीब लाभार्थ्यांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रेशन दुकाने आएसओ, सीएसस्सी सेंटरसारख्या यशस्वी उपक्रमांनंतर धनिकांनी शासनाच्या अन्नसुरक्षा अनुदानातून बाहेर पडावे असे आवाहन पुरवठा विभागाचे उपायुक्त यांनी केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त आवाहनानुसार अद्यापपर्यंत किती सधन कार्डधारकांनी या योजनेतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे,

(६) असल्यास, त्यानुसार काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२२-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना दर महिना प्रति लाभार्थी ५ किलो एवढ्या परिमाणात अन्नधान्य अनुज्ञेय आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे. सोलापूर भागातील उच्चभ्रू वर्गातील अन्नसुरक्षा योजनेचे लाभार्थी ज्या वेळी सदर योजनेचा लाभ घेत होते, त्यावेळीची त्यांची उत्पन्न मर्यादा ही शासनाने ठरवून दिलेल्या निकषांप्रमाणे होती.

(४) होय, हे खरे आहे.

(५) सोलापूरातील एकूण ६१० शिधापत्रिकाधारक "अन्नधान्याच्या अनुदानातून बाहेर पडा" या योजनेंतर्गत अन्नधान्याच्या अनुदानातून स्वेच्छेने बाहेर पडले आहेत.

(६) "अन्नधान्याच्या अनुदानातून बाहेर पडा" या योजनेंतर्गत प्राधान्य कुटुंब (PHH) योजनेतून NPH मध्ये वर्ग करावयाच्या शिधापत्रिकांची यादी प्रमाणीत करून शासनास सादर करण्याबाबत शासनाकडून कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने सदर याद्या तयार करून प्रमाणीत करण्याची कार्यवाही चालू आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यातील भूमिहीन व गरीब नागरीकांची नावे शेतकरी रेशन कार्ड (APL) योजनेमधून अन्नसुरक्षा (PHH) योजनेमध्ये समाविष्ट करण्याबाबत

**(३४) ५४२६० (१९-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात अनेक गावांत शेतकरी रेशन कार्ड (APL) योजनेमध्ये भूमीहीन व गरीब नागरीकांचा समावेश करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकरी शिधापत्रिका (APL) धारक लाभार्थ्यांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या धान्यापैकी केवळ तांदूळ (प्रति व्यक्ती ०२ किलो) देण्यात येत असून गहू देण्याचे जून- २०२२ पासून बंद करण्यात आल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गरीब योजनेचे लाभार्थी शासनाच्या योजनेपासून वंचित रहात असल्याने त्यांची नावे शेतकरी रेशन कार्ड (APL) योजनेमधून अन्नसुरक्षा (PHH) योजनेमध्ये समाविष्ठ करून त्यांना धान्य उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांच्याकडे दिनांक २९ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार किती भूमिहीन व गरीब नागरिकांचा अन्नसुरक्षा (PHH) योजनेमध्ये समावेश केला वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत समाविष्ट न झालेल्या म्हणजेच ग्रामीण भागातील ₹ ४४,०००/- ते ₹ १ लक्ष व शहरी भागातील ₹५९,०००/- ते ₹ १ लक्ष पर्यंत वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असलेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या धर्तीवर सवलतीच्या दराने अन्नधान्याचा पुरवठा करण्याची शेतकरी योजना बीडसह राज्यातील १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांत कार्यान्वित आहे.

(२) एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांसाठी उचल करीत असलेल्या Non-NFSA योजनेंतर्गत अन्नधान्य उपलब्ध होणार नसल्याचे भारतीय अन्न महामंडळाने कळविले असल्याने शेतकरी योजनेंतर्गत अन्नधान्य उपलब्ध झालेले नाही.

(३) होय.

(४) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अनुदानित अन्नधान्यासाठी विहीत केलेल्या निकषांनुसार ग्रामीण भागातील ₹ ४४,०००/- व शहरी भागातील ₹ ५९,०००/- पर्यंत वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असलेल्या दारिद्र्यरेषेवरील (एपिएल-केशरी) शिधापत्रिकाधारकांचा प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांमध्ये (Priority Households-PHH) समावेश

करण्यात आला आहे. शेतकरी योजनेचे लाभार्थी हे ₹ ४४,०००/- व ₹५९,०००/- ते ₹ १ लक्ष पर्यंत वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असलेले एपिएल (केशरी) शिधापत्रिकाधारक असल्याने त्यांचा प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांमध्ये (PHH) समावेश करणे शक्य नाही.

ग्रामीण भागातील ₹ ४४,०००/- व शहरी भागातील ₹ ५९,०००/- पर्यंत वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असलेल्या शिधापत्रिकाधारकांचा राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अनुदानित अन्नधान्यासाठी पात्र लाभार्थ्यांच्या यादीत समावेश करण्याची कार्यवाही निरंतर सुरु असते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जोडमोहा ते कळंब (ता.कळंब, जि.यवतमाळ) रस्त्याच्या दुरूस्तीकरिता निधी देण्याबाबत**

**(३५) ५४२८५ (१८-०१-२०२३). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोडमोहा ते कळंब (ता.कळंब, जि.यवतमाळ) हा तालुक्यातील अतिमहत्वाचा रस्ता असुन मागील ब-याच वर्षापासुन रस्त्याची दुरुस्ती न झाल्याने जागोजागी खडडे पडुन रस्त्याच्या दुरवस्थेमुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे दि १२ नोव्हेबंर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता हा राज्यमहामार्ग असून अरूद असल्याने जोडमोहा गावाजवळील अरूद पुलाजवळ अपघात होउन काही प्रवाशांचा मुत्यृ झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या राज्यमहामार्गाच्या दुरूस्तीकरीता कधी पर्यंत निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२४-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पोलीस स्थानकामध्ये दाखल झालेल्या प्रथम खबर अहवालाचे अवलोकन केले असता दि.१६.०२.२०२० रोजी वाहन चालकाने क्षमतेपेक्षा जास्त अवैध प्रवासी घेऊन भरधाव वेगाने वाहन चालविल्यामुळे अपघात झाल्याचे आढळून आले आहे.

(३) व (४) वार्षिक देखभाल दुरुस्ती कार्यक्रमाअंतर्गत रस्त्याचे खड्डे भरण्याची कामे झालेली आहेत. तथापि, सदर रस्त्याचे मजबुतीकरणासह नुतनीकरण करण्याच्या कामाबाबत निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम हाती घेण्याची नियोजन राहील.

---

**महाराष्ट्र राज्यातून प्रकल्प स्थलांतरीत झाल्याबाबत**

**(३६) ५४६११ (१८-०१-२०२३). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यातील दिनांक १ जून, २०२२ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत एकूण किती मोठे उद्योग प्रकल्प परराज्यात गेले आहेत,

(२) असल्यास, सदर प्रकल्प परराज्यात स्थलांतरीत होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, मोठी गुंतवणूक असलेले व मोठे रोजगाराभिमूख प्रकल्प महाराष्ट्र राज्यात आणण्याच्या दृष्टीने शासनाने कोणत्या प्रकारचे धोरण अवलंबिले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२७-०२-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

दि.१ जून,२०२२ ते दि.३१ ऑक्टोबर,२०२२ या कालावधीत राज्य शासन /महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाशी सामंजस्य करार करण्यात आलेला एकही मोठा उद्योग प्रकल्प परराज्यात गेलेला नाही.

(३) राज्यातील उद्योग क्षेत्रात अधिकाधिक गुंतवणुक यावी व त्याव्दारे मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती व्हावी याकरीता महाराष्ट्रामध्ये उद्योग पुरक वातावरण निर्मिती करण्यात आली असून, अद्यावत औद्योगिक पायाभूत सुविधा, प्रगत आद्योगिक धोरण, सामुहिक प्रोत्साहन योजना, क्षेत्र निहाय विशेष औद्योगिक धोरणे तसेच EoDB ( Ease of Doing Business) अंतर्गत मोठया गुंतवणुकदारांना मार्गदर्शन तसेच गुंतवणुकीबाबत सर्वोतोपरी सहाय्य करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेले रिलेशनशीप मॅनेजरर्स व रिलेशनशीप एक्झीक्युटीव्ह तसेच प्रमुख विदेशी गुंतवणुकदारांना सहाय्य करण्यासाठी स्थापन करण्यात आलेले समर्पित विदेश कक्ष, एक खिडकी योजना इत्यादी योजना राबविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकृषि विद्यापीठातील रिक्त शिक्षक व शिक्षक समकक्ष पदे भरण्याबाबत**

**(३७) ५४६४१ (१९-०१-२०२३). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकृषि विद्यापीठातील रिक्त असलेली शिक्षक व शिक्षक समकक्ष पदे भरण्याबाबतचे निर्बंध शिथील करण्यात आल्याचे दिनांक १६ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाच्या संस्कृत विभागातील सहायक प्राध्यापकांची पदे, याच विद्यापीठातील चाणक्य संस्थेमधील सहायक प्राध्यापक पदे तसेच विद्यापीठाच्या Centre for Hindu Studies या विभागातील सहायक प्राध्यापकाची पदे अद्यापही रिक्त आहेत हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या अनुदानित महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक, ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहाय्यक पदे भरण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री तसेच उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी एका आढावा बैठकीमध्ये घेतल्याचे बाब, माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न असलेल्या अनुदानित ४४ महाविद्यालयांत १८४ पदे भरण्यासाठी मंजूरी मिळाली असतांनाही प्राध्यापक, प्राचार्य भरतीसाठी विद्यापीठस्तरावर मागासवर्गीय कक्षाकडून '' रोस्टर'' (बिंदुनामावली) प्रमाणित करुन घेण्याच्या फे-यात ही प्रक्रिया प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(५) तसेच, माहे जून, २०२३ पासून सुरु होणाऱ्या नवीन शैक्षणिक वर्षांमध्ये मुंबई विद्यापीठातील सहायक प्राध्यापकाच्या पदांचा अनुशेष भरुन काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२२-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अशंत: खरे आहे.
विद्यापीठातील संस्कृत विभागात तीन कायमस्वरूपी सहायक प्राध्यापक कार्यरत आहेत. तसेच दोन हंगामी सहायक प्राध्यापकांची नेमणूक करण्यात आली आहे. विद्यापीठातील चाणक्य संस्था व Centre for Hindu Philosophical Studies हे विभाग विद्यापीठाच्या फंडातून चालविले जातात. सदर विभागामध्ये प्रभारी उपसंचालकांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) शासन निर्णय दि.०७.०८.२०१९ व दि.१६.११.२०२२ अन्वये अकृषि विद्यापीठांमधील मंजूर शिक्षकीय पदांच्या ८० टक्के इतक्या मर्यादेत रिक्त पदे भरण्यास मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार मुंबई विद्यापीठास एकूण १३६ रिक्त पदे भरण्यास मंजूरी देण्यात आली आहे. विद्यापीठाकडून महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ मधील तरतुदीनुसार सुधारित बिंदुनामावली तयार करून त्यास संबंधित प्राधिकरणाची मान्यता

घेण्याची प्रक्रिया सुरू असून सदर प्रक्रिया पूर्ण होताच विद्यापीठाकडून जाहिरात प्रसिध्द करून रिक्त पदे भरली जातील.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोनगीर (ता.जि.धुळे) येथे नवीन शासकीय विश्रामगृह बांधण्याबाबत

**(३८) ५४६६६ (१८-०१-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनगीर (ता.जि.धुळे) येथे शासकीय विश्रामगृह बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी शासनाकडे दि. ८ नोव्हेंबर २०२२ रोजी केली आहे, हे खरे आहे काय ?
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१३-०३-२०२३) :**(१) होय. हे खरे आहे.
स्थानिक लोकप्रतिनिधींनी त्यांचे दि.७.११.२०२२ च्या पत्रान्वये सदर कामाची मागणी केली आहे.
(२) सद्य:स्थितीत सदर शासकीय विश्रामगृह बांधण्यासाठी शासकीय जागा उपलब्ध नसल्याने, जागेची उपलब्धता, निकष, निधी व प्राधान्यक्रमानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आरमोरी ते गडचिरोली (जि.गडचिरोली) रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(३९) ५४७८७ (१८-०१-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग क्र. ३५३-सी या महामार्गातील आरमोरी ते गडचिरोली (जि.गडचिरोली) रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२२-०२-२०२३) :**(१) होय.
(२) केंद्र शासनाच्या वार्षिक आराखडा २०२२-२३ अंतर्गत सदर रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, एस विभाग यांचे नवी मुंबई येथून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एस विभागात स्थलांतर करण्याबाबत

**(४०) ५४९१३ (२५-०१-२०२३). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, एस विभाग यांचे कोकण भवन, नवी मुंबई येथील कार्यालय एस विभागातच स्थलांतर करावे, अशी मागणी दिनांक १४ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, एस विभाग यांचे नवी मुंबई येथून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एस विभागात स्थलांतराबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२३-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) दि कोकण प्रांत सहकारी बँक मर्या., मुंबई (अवसायनात) या बँकेची भांडुप येथील मालकीची जागा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एस विभाग यांना उपलब्ध करुन देणेबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२), पूर्व उपनगरे यांनी दि.२५.०२.२०२१ च्या पत्रान्वये विनंती केली आहे. त्यानुसार सदर बँकेकडे जागेसंदर्भात आवश्यक पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर शहर मतदारसंघातील कामांना निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(४१) ५५०४५ (१८-०१-२०२३). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर मतदारसंघातील रस्त्यांची कामे करण्यासाठी शासनाने अर्थसंकल्पीय २०२२-२३ या वर्षी लेखाशीर्ष ५०५४/०३ व ५०५४/०४ अंतर्गत माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान रुपये २४ कोटींचा निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे का,
(२) असल्यास, सदर मंजूर निधी वापरास विद्यमान शासनाने मनाई केली असुन त्या कामांना स्थगिती दिली असल्याचे माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्यांच्या कामांना स्थगिती देण्यात आल्यामुळे नागरीकांची गैरसोय होत असल्याने सदर रस्त्याच्या कामांना दिलेली स्थगिती उठवून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२२-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
अर्थसंकल्प मार्च, २०२२ लेखाशिर्ष ५०५४/०३ व ५०५४/०४ अंतर्गत अहमदनगर कामाकरिता २ रस्ते कामाकरीता रु.२२.६० कोटीची कामे मंजूर आहेत.
(२) हे खरे आहे.
सा.बां.विभागाने शासन पत्र क्र. आरएमआर २०२२/ प्र.क्र.१२४/रस्ते-१,दि.२३/०७/२०२२अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील रस्ते उपक्षेत्रांतर्गत अर्थसंकल्पित असलेल्या राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, समुद्र धूप प्रतिबंधक बंधारे, रेल्वे उड्डाणपूल व इमारती उपक्षेत्रांतर्गत निरीक्षण बंगले, विश्रामगृहे, शासकीय कार्यालयीन व निवासी इमारती घटकांतर्गत तसेच रस्ते परिरक्षण दुरुस्ती मधील विशेष दुरुस्ती व पूरहानी दुरुस्तीची दि.०१.०४.२०२१ पासून ज्या कामांच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत, मात्र कार्यादेश दिलेले नाहीत किंवा कार्यादेश देऊनही कामे सुरु झाली नाहीत अशा कामांना शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात आली आहे.
(३) सा.बां.विभागाने दि.२३/०७/२०२२ च्या पत्रान्वये स्थगित केलेल्या कामांचे पुनर्विलोकन करुन नविन इमारती बांधणे, इमारतीची देखभाल व दुरुस्तीची कामे, धुपप्रतीबंधक बंधारे, घाट रस्ते, नविन पुल व पुलांची दुरुस्ती, रेल्वे उड्डाणपूल तसेच काही रस्त्यांचे डांबरीकरण व मजबुतीकरण व दुरुस्तीची कामे या वरील स्थगिती उठविण्यात आली आहे.
स्थगित केलेल्या उर्वरित कामांचे पुनर्विलोकन करुन यथायोग्य निर्णय घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव ते चाळीसगाव या राष्ट्रीय माहामार्ग क्र. ७५३ वरील या १३ राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३ वळणावरील जमिन अधिग्रहणामुळे रस्त्यांची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(४२) ५५०५४ (१८-०१-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव ते चाळीसगांव (जि.जळगांव) या राज्य मार्ग क्रमांक १९ चे रुपांतर जळगांव ते चांदवड राष्ट्रीय महामार्ग

क्र.७५३ करण्यात आल्यानंतर जळगांव ते चाळीसगाव या १०० किमी अंतरात तब्बल १३ ठिकाणी वळणावर जमिन अधिग्रहणामुळे रस्त्यांची दुरवस्था झाली असून कामेही प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याच्या वळणावरील रामदेववाडी ते वावडदा, वावडदा ते वडली, वडली ते पाथरी, सामनेर, लासगांव, नांद्रा, वडगांव फाटा, आर.के. हॉटेलजवळ, कोठली फाटा, पासर्डी गावानजिक , भोरटेक, उमरखेड फाटा, हिंगोणे येथे अडथळे निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२०-०२-२०२३) :**(१) होय.

(२) होय.

(३) सदर काम भुसंपादना अभावी प्रलंबीत असुन सदर भूमि अधिग्रहणाची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दहिगांव (ता. पाचोरा, जि.जळगांव) मौजे वरसाडे येथील दहिगांव गिरणा बंधाऱ्यासाठी महाराष्ट्र महसूल विभागातर्फे संपादित झालेल्या जमिनी शेतकरी बांधवांना परत मिळणेबाबत

**(४३) ५५०७५ (२९-०१-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिगांव (ता. पाचोरा, जि.जळगांव) मौजे वरसाडे येथील मतदार संघातील प्र.बो दहिगांव, डोकलगांव, येथील शेतकऱ्यांच्या दहिगांव गिरणा बंधाऱ्यासाठी महाराष्ट्र महसूल विभागातर्फे संपादित केलेल्या जमिनी शेतकऱ्यांना बांधवांना परत मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे काय त्यांचे स्वरूप काय आहे व याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२१-०२-२०२३) :**(१) मा.उप मुख्यमंत्री यांना अशा आशयाचे दि.२८.०८.२०२२ रोजी लोकप्रतिनिधींनी निवेदन दिलेले आहे.

(२) उक्त निवेदनाषुंगाने सदर जमीनींबाबत जिल्हाधिकारी, जळगाव यांनी खालीलप्रमाणे नमूद केले आहे. मौजे दहिगाव, डोकलखेडा व वरसाडे प्र.बो.ता.पाचोरा येथील ७/१२ उतारे व तहसिलदार पाचोरा यांच्याकडील स्थळनिरीक्षण अहवालानुसार उक्त नमूद काही गट क्रमांक मधील क्षेत्र हे आज रोजी पडीक असून काही गटांमध्ये पिक लावलेले दिसून येत आहे तसेच उक्त गटांमध्ये पावसाळ्यात गिरणा नदीला पूर परिस्थितीप्रमाणे पाणी आल्यावर काही गटांमध्ये गिरणा नदीचे पाणी शिरलेले असते. या पाणी शिरल्याने संपादीत जमीनी ह्या ओलीताखाली असतात. तसेच दहिगाव गिरणा बंधाऱ्यातून सोडण्यात येणारे आवर्तनानुसार संपादित गटांतील पाणी निघून जाते. परंतु पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यास संपादीत संपूर्ण जमीनी ह्या ओलीताखाली असतात. त्यामुळे संपादीत झालेल्या जमीनी ह्या शेतकरी यांनी मागणी केल्यानुसार परत देणे उचित होणार नाही. तसेच, विषयांकित जमीनी मूळ मालकास परत केल्यास संभाव्य नैसर्गिक आपत्ती प्रसंगी विभागाकडे आपत्ती व्यवस्थापनाकरिता पर्याय राहणार नाही. “

शासन निर्णय क्र.एलक्यूएन-३०/२०००/प्र.क्र.६७/अ-२,दि.१२.०३.२००४ अन्वये खालील धोरण निश्चित करण्यात आले आहे.

संपादित विनावापर बिनशेती जमीनीची विल्हेवाटीबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने या संदर्भात शासनाचे असे आदेश आहेत की, सर्वोच्च न्यायालयाच्या दि.५/५/१९९७ च्या आदेशानुसार अशा संपादन प्रयोजनासाठी वापरुन अतिरिक्त झालेल्या किंवा विनावापर असलेल्या जमिनीची अन्य सार्वजनिक प्रयोजनसाठी आवश्यकता नसेल तर संबंधित जिल्हाधिकारी यांनी अशा बिनशेतीच्या किंवा बिनशेतीची क्षमता प्राप्त झालेल्या जमीनींची केवळ जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्यात यावी. तसेच या लिलावात मूळ भूधारकसुध्दा भाग घेऊ शकतील. या विक्रीतील निधी संविधानातील मार्गदर्शक तत्वात अभिप्रेत असलेल्या अतियोग्य अशा सार्वजनिक उद्दिष्टांसाठी वापरण्यात यावा. त्यामुळे सदर जमिनी मूळ मालकाला परत करता येणार नाहीत.
(३) अशी बाब नाही.

---

**जळगांव जिल्हयातील वाहतूकीचा राज ट्रान्सपोर्ट, लातूर यांना देण्यात आलेला ठेका रद्द करुन कामाची चौकशी करणेबाबत**

**(४४) ५५०७७ (१८-०१-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हा व पाचोरा-भडगांव मतदार संघात शासकीय रेशनिंग दुकानांचा माल (गहू व तांदूळ) वाहतूकीचा राज ट्रान्सपोर्ट, लातूर यांना देण्यात आलेला ठेका रद्द करुन कामाची चौकशी करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६.१०.२०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१३-०२-२०२३) :**(१) हे खरे आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणाची वस्तुस्थिती दि.३१.०१.२०२३ च्या शासन पत्रान्वये मा.श्री.किशोर आप्पा पाटील, (पाचोरा) वि.स.स. यांना कळविण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर ३ येथिल प्रशासकीय इमारतीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४५) ५५३०६ (१८-०१-२०२३). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर ३ येथे सर्व शासकीय कार्यालय एकत्र असावे यासाठी लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या मागणीनुसार याला सन २०१० मध्ये वा त्यादरम्यान प्रशाकीय मान्यता प्राप्त झालेली असून इमारतीची अनेक कामे प्रलंबित असल्याने या प्रलंबित कामांसाठी निधी मिळावा अशी मागणी मा. मुख्यमंत्री आणि मा.उप मुख्यमंत्री व संबंधित विभागाकडे दिनांक १७/८/२०२२ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत अधीक्षक अभियंता आणि मुख्य अभियंता यांनी देखील अनुक्रमे दिनांक १७/३/२०२० आणि दिनांक २१/८/२०२० रोजी प्रत्रांद्वारे सचिव बांधकामे, सार्वजनिक विभाग यांच्याकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर इमारतीमध्ये १४१ उल्हासनगर विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय तथा तहसीलदार कार्यालय सुरु करण्याची मागणी सुद्धा लोकप्रतिनिधी राज्य शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने निधी उपलब्ध होऊन सदर कार्यालयाचे उर्वरीत काम पुर्ण होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-०३-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे. उल्हासनगर येथे कँप क्र. ५ येथे दोन स्वतंत्र प्रशासकीय इमारती बांधण्याच्या कामास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि. २५.६.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, कोकण यांच्या दि.२१.८.२०२० रोजीच्या पत्रान्वये उल्हासनगर येथील कँप क्र. ३ कँप क्र.५ येथील प्रशायकीय इमारती सुधारीत अंदाजपत्रक शासनास प्राप्त झाले आहे.

(३) होय हे खरे आहे.

(४) व (५) सदर कामाच्या मूळ प्रशासकीय मान्यता किंमतीत वाढ होत असल्याने या कामास सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्याकरिता आवश्यक कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यावर इमारतींची उर्वरित कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## कुंभारमाट (ता.मालवण, जि.सिंधुदूग) येथे शासकीय डी.फार्मसी व बी.फार्मसी महाविद्यालय सुरु करण्याबाबत

**(४६) ५५४३३ (१८-०१-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुभाष धोटे (राजूरा), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या तंत्रशिक्षण संचालनालयाने दि.१६/२/२०२२ रोजीचे पत्राद्वारे सिंधुदुर्ग जिल्हयात शासकीय तंत्रनिकेतन, मालवण परिसरात शासकीय डी.फार्मसी व बी.फार्मसी महाविद्यालय सुरु करण्याचा विस्तृत प्रकल्प अहवाल (डीपीआर) शासन मान्यतेसाठी सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यास अनुसरुन प्रस्तावित डी. फार्मसी व बी.फार्मसी महाविद्यालय हे शासकीय तंत्रनिकेतन, कुंभारमाट (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) या संस्थेच्या आवारात उपलब्ध असलेल्या शासनाच्या मालकीच्या जागेवर सुरु करण्याच्या प्रस्तावित बाबीवर शासनाने निर्णय घेऊन सदर जमीन संपादित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर महाविद्यालयासाठी शासनाने एकूण किती निधीची तरतूद केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१६-०२-२०२३) :** (१) होय,

(२) तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत शासनास सादर करण्यात आलेल्या प्रकल्प अहवालाच्या (DPR) अनुषंगाने विभागाकडून तपासणी करण्यात येऊन काही मुद्यांबाबतची माहिती तंत्रशिक्षण संचालनालयाकडून मागविण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने संचालनालयामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औसा (जि.लातूर) येथे शासकीय निवासस्थाने बांधण्याबाबत

**(४७) ५५५८३ (१८-०१-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) तालुक्यातील तालुकास्तरीय खाते प्रमुख व कर्मचारी यांच्यासाठी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुकास्तरीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी निवासस्थाने बांधकाम करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग लातूर यांनी सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे सन २०२२ मध्ये रितसर प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रस्ताव मंजूर करुन निवासस्थाने बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-०३-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असुन निधी उपलब्धतेच्या अधिन राहून पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

---

**अंबाजोगाई( जि. बीड.) येथे मराठी भाषेचे विद्यापीठ स्थापन करणेबाबत**

**(४८) ५६३७० (१९-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि. बीड) या शहराची शांतीचे प्रतिक व मराठी संतांची भूमी म्हणून ओळख असून येथे मराठी भाषेचे आद्यकवी मुकुंदराज स्वामी, दासोपंत स्वामी यांच्या पवित्र पावन स्मृती या शहरात असल्याने येथे मराठी भाषेचे विद्यापीठाची स्थापना करण्याबाबत शासनाकडे मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२३-०२-२०२३) :**(१) व (२)हे अंशत: खरे आहे;
अंबाजोगाई जि.बीड या ठिकाणी मराठी भाषा विद्यापीठ स्थापनेसाठी निवेदने प्राप्त होत असली तरी राज्यातील अन्य ठिकाणी जसे की रिद्धपूर, जि. अमरावती व नेवासा, जि. अहमदनगर या ठिकाणी मराठी भाषेचे विद्यापीठ स्थापनेबाबतचे प्रस्ताव शासनास प्राप्त झालेले आहेत.
मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्याच्या अनुषंगाने समिती गठीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबाजोगाई (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथे विश्रामगृह बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४९) ५६३८४ (१९-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथे अतिमहत्त्वांच्या व्यक्तीसाठी विश्रामगृह बांधकामासाठी रुपये १३८१.२४ लक्ष इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेसाठी शासनास सादर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ईमारत जीर्ण झाल्यामुळे या ठिकाणी नवीन ईमारतीचे बांधकाम करणे आवश्यक असल्याने यांस प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दि. ०८/१०/२०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने वरील प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर विश्रामगृहाच्या बांधकामास मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-०३-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असुन निधी उपलब्धतेच्या अधिन राहुन पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

---

**मुंबईतील जय हिंद कॉलेज मध्ये अंतर्गत परीक्षेत पेपर फुटी झाल्याबाबत**

**(५०) ५६४५१ (१९-०१-२०२३). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील जय हिंद कॉलेज मधील परीक्षेअंतर्गत पेपर फुटी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१६-०२-२०२३) :**(१) हे खरे नाही. जय हिंद महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातील एस.वाय.बी.कॉम.–'जाहिरात' ह्या विषयाचा पेपर दोन शिक्षक संयुक्तपणे शिकवत होते व दोघेही सदर पेपर सामायिकरित्या हाताळत होते. त्यामुळे त्यांनी २० गुणांच्या अंतर्गत मूल्यांकन परीक्षेसाठी एकत्रितपणे प्रश्नांची यादी तयार केली होती. तथापि, शिक्षकांच्या नेहमीच्या पद्धतीनुसार नियोजित अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर एका शिक्षकाने अध्यायाच्या पुनरावृत्तीवर व्याख्यान घेतले होते ज्यामध्ये त्यांनी नियोजित अंतर्गत परीक्षेसाठी सेट केले जाणाऱ्या संभाव्य प्रश्नांची चर्चा केली होती. सदर तक्रार प्राप्त होताच प्राचार्यांनी चौकशी समिती गठीत केली. समितीने शिफारस केल्यानुसार वरील बाबी लक्षात घेऊन परीक्षा नियंत्रकाने वाणिज्य विभागातील दुसऱ्या शिक्षकाला नियोजित पेपरसाठी पर्यायी प्रश्नपत्रिका सेट करण्याची सूचना केली. त्यामुळे वर्गात चर्चा केलेली प्रश्नपत्रिका मागे घेण्यात आली आणि इतर शिक्षकांद्वारे प्रश्नांच्या नवीन संचासह एक नवीन पेपर परीक्षेच्या दिवशी वापरण्यात आला. त्यामुळे प्रश्नपत्रिका फुटण्याचा प्रकार रोखण्यात आला.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.